जिल्हा परिषद सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेसाठी पंचायतराज सेवार्थ प्रणाली लागू करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/मातंक
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीख: ०७ जून,२०१९

वाचा-

१. शासन निर्णय ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग क्र. डिएसआर-२००९/प्र.क्र.६१/आस्था-५ दिनांक २० मे, २००९
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र. वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दिनांक ०१ जानेवारी, २०१९.
३. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९.
४. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना-

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याकरीता श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनाने काही फेरफारसह स्वीकृत करण्याचा निर्णय संदर्भ क्र. ०२ येथील शासन निर्णयान्वये घेतला आहे. राज्यातील या विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या जिल्हा परिषदांमधील वर्ग-०३व वर्ग-०४च्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू शासन निर्णय क्र. डिएसआर-२०१९प्र.क्र.१६आस्था-०५दि. ०६ मार्च,२०१९अन्वये लागू करण्यात आली आहे.

शासन परिपत्रक -

सदर वेतन संरचना महाराष्ट्र आयटी कॉर्पोरेशनद्वारे पंचायत राज सेवार्थ प्रणालीवर सुधारित करण्यात आल्या आहेत. सदर कस्टमाईज सेवार्थ प्रणालीच्या यूजर ॲक्सेप्टन्स टेस्टींग साठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीची दि. २२.०५.२०१९ रोजी बैठक झाली. समितीने शिफारस केल्यानुसार सदर प्रणाली सुधारित संरचनेसाठी राज्यभरात उपलब्ध करण्यात येत आहे. सर्व जिल्हा परिषदांनी याचा लाभ घ्यावा. या संदर्भात काही तांत्रीक अडचणी उद्भवल्यास श्री. शिवकृष्णा येनागंटी, बिजनेस ॲनॅलिस्ट (महाराष्ट्र आयटी कॉर्पोरेशन, रू.नं.५१४, ५ वा मजला, ॲनेक्स बिल्डींग, हुतात्मा राजगूरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२) (संपर्क क्र. ०२२-६६३६४३२७, ई-मेल आयडी- basevaarth@gmail.com) यांच्याशी संपर्क साधावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०७१७२८५८८१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Rural Development Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2019.06.15 12:06:50 +05'30'

(सरोज देशपांडे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, महाराष्ट्र आयटी कॉर्पोरेशन, रू.नं.५१४, ५ वा मजला, ॲनेक्स बिल्डींग, हुतात्मा राजगूरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
३. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.
४. कक्ष अधिकारी (आस्था-५/वित्त-५), ग्रामविकास विभाग,मंत्रालय, मुंबई-४००००१.
५. निवड नस्ती, माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४००००१.